

# मराठी - लेख - 3

**आसावरी सुर्वे, शाळा :** विद्या मंदिर, दहिसर

विद्यार्थी मित्रांनो,

आज आपण पाठ्यपुस्तकामधील ३ आणि ४ पाठांचा अभ्यास करणार आहोत.

**पाठ क्रमांक ३**

**शेतकऱ्यांची परिस्थिती - महात्मा फुले**

महात्मा फुले यांच्या कार्याने स्वातंत्र्यपूर्व काळात ज्ञानप्रकाशाची प्रभा पसरली. ज्ञानाच्या श्रद्धेचा प्रकाश समाजाला तारक ठरतो. या सत्यधर्मावर आधारित विचारधनामुळे समाजघटकांना सन्मानाने जीवन जगता यावे याकरिता वैचारिक क्रांती झाली आणि श्रमिक शेतकऱ्यांच्या वेदना बोलक्या झाल्या.

महात्मा फुले यांनी आंगीकारलेल्या कित्येक सुधारणा आजही समाजाने स्वीकारल्या आहेत. विधवा विवाहापासून ते स्त्री-शिक्षणापर्यंतचा पुरोगामी विचार असो किंवा जातिभेदाबाबत मांडलेले दूरगामी सुधारक विचार असोत, एकराष्ट्रीयत्वासाठी शेतकऱ्यांकडे लक्ष देणे ही त्यांची आंतरिक तळमळ होती. म्हणूनच भारतातील सामान्य जनतेच्या नवयुगाचा प्रेषित असा त्यांचा गौरव केला जातो.

'शेतकऱ्याचा असूड' हा त्यांचा ग्रंथ अनेक दृष्टींनी अपूर्व आहे. या ग्रंथात त्यांनी शेतकऱ्याच्या अवनत स्थितीचे विदारक चित्र रेखाटले आहे. शेतकऱ्यांच्या माथी लादलेले कर्ज व त्यावरील डोईजड व्याज कमी करावे, सर्वस्वी कंगाल बनलेल्या शेतकऱ्यांत असंतोष निर्माण होऊ नये म्हणून शेतकऱ्याला संरक्षण देण्याच्या दृष्टीने इंग्रज सरकार जे कायदे करीत होते, त्यांचा फायदा शेतकऱ्यांना मिळावा, म्हणून महात्मा फुले अत्यंत जागरूक होते.

'शेतकऱ्यांची परिस्थिती' या लेखामध्ये महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांचे दीनवाणे कारुण्य मांडले आहे. अज्ञानी शेतकरी आणि गोरे सोजीर यांच्या स्थितीची तुलना मार्मिक शब्दात केली आहे. शेतकऱ्यांच्या संघर्षमय जगण्याचा शोध घेतला आहे.

शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी त्यांनी काही उपाय सुचविले आहेत.

१) सरकारला शेतकऱ्यांविषयी खरा कळवळा असेल तर त्यांनी शेतकऱ्यांवर विलायती सावकारांचे असलेले कोट्यवधी रुपयांचे व्याज रद्द करावे.

२) सरकारने आपल्या सर्व खात्यांतील गोऱ्या व काळ्या कामगारांस वाजवीपेक्षा जास्ती केलेले पगार कमी करावेत. तो वाचलेला पैसा शेतकऱ्यांच्या शिक्षणासाठी खर्च करावा.

३) शेतकऱ्यांच्या डोक्यावरील शेतसारा, टोल वगैरे पट्ट्या कमी कराव्यात.

४) शेतकरी व सरकारी कामगार यांच्या विसंगत जीवनशैलीविषयी गांभीर्य ठेवावे. ऐषोरामी उधळ्या सरकारने जागरूक व्हावे.

पूर्वीच्या सामाजिक चौकटीत जी विषमता दिसत होती, तसेच जे अन्याय होत होते त्याला वाचा फोडली. इंग्रजी अमदानीतील भारतीयांचा उल्लेख करताना या लेखात 'नेटिव्ह' हा शब्द आलेला आहे. हे नेटिव्ह कामगार ऐषआरामी युरोपियन कामगारांची खुशामत करतात. अज्ञानी शेतकऱ्यांकडून लाच घेतात. त्यांना लुबाडतात. शेतकऱ्यांवर हा अन्याय होतो. त्यामुळे त्यांचे जगणे अतिकष्टाचे होते.

वर्षानुवर्षे हा जुलूम चालू आहे. पण यातून काही योग्य मार्ग काढला नाही, तर त्याचे गंभीर परिणाम होतील, असे महात्मा फुले यांनी आग्रहाने सांगितले आहे.

**पाठ क्र. ४**

**विद्याभ्यास - काशीबाई कानिटकर**

**प्रस्तावना -** काशीबाई कानिटकर यांनी लेखणीला सखी मानलं आणि 'रंगराव' कादंबरीने लेखनाला सुरुवात केली. 'पालखीचा गोंडा', शेवट तर गोड झाला आणि 'चांदण्यातील गप्पा' यासारखे समृद्ध लेखन केले. एकदा लेखन मार्गाची वाट धरल्यावर आव्हानात्मक नव्या दिशा दिसू लागल्या. त्यातूनच त्यांनी "डॉ. आनंदीबाई जोशी यांचे चरित्र" लिहून डॉ. आनंदीबाईंचा जीवनार्थ शोधला. समकालीन स्त्रीचं चरित्र एका दुसऱ्या स्त्रीनं लिहिणं ही अपूर्वाईची गोष्ट आहे. आनंदीबाईंच्या मृत्यूनंतर अवघ्या दोन वर्षांत त्यांचे चरित्र लिहावं ही घटना ऐतिहासिक मोलाची आहे.

त्या काळातील समाजस्थितीचा विचार केला तर पारतंत्र्याचे ते दिवस होते. स्त्रियांना प्राथमिक शिक्षण देणं ही कल्पनाच भारतात धाडसाची होती. स्त्री शिक्षणात सर्वांत मोठी अडचण म्हणजे बालविवाहाची. समाजविरोध पत्करून मुलींच्या शाळा चालवणं, हे त्या काळी फार जिकिरीचं काम होतं, तत्कालीन समाजसुधारकांनी स्त्रीला शिक्षणापासून वंचित ठेवणं योग्य नव्हे, या विचाराचं लोण विविध स्तरांतून पसरविलं होतं. शतकानुशतकं उंबरठ्याआड थबकलेली स्त्री आता मोकळा श्वास घ्यायला सज्ज झाली. आनंदीबाई जोशी या अशाच स्त्रियांच्या प्रतिनिधी आहेत.

**पाठाचा आशय -**

आनंदीचा विवाह ही तिच्या जीवनाला नवी आशादायक दिशा देणारी घटना घडली. आनंदीच्या जीवनाला अर्थपूर्ण वळण देणारी व्यक्ती म्हणजे श्री. गोपाळ विनायक जोशी. गोपाळराव काळाबरोबर धावणारे द्रष्टे पुरुष होते. आनंदीबाईंना शिकवणं हा त्यांचा ध्यास होता. आनंदीच्या आकांक्षेला योग्य आकार कोणत्या गावात राहून देता येईल? विचार करता करता गोपाळरावांच्या नजरेत कोल्हापूर भरलं. कोल्हापूर संस्थान स्त्री शिक्षणास अनुकूल होतं. तिथे उत्तम शिक्षण देणारी मुलींची शाळा होती. गोपाळरावांनी कोल्हापुरास बदली करून घेतली. कोल्हापुरास राजकीय स्त्री विद्यालयात एक मोठी नामांकित गौरवर्ण स्त्री शिकवीत असे. त्यांचे नाव मिस मायसी असे होते. मायसीबाईंचा नावलौकिक ऐकून गोपाळरावांनी कोल्हापूर येथे आपली बदली करून घेतली.

या पाठामध्ये आनंदी गोपाळ यांचे शत्रू, मित्र दोन्ही सारखेच वाटतात.

जो आपल्याला तोडण्यासाठी घाव घालतो किंवा जो आपल्याला रुजवितो त्या दोघांनाही वृक्ष सारखीच सावली देतो. भक्तांच्या ठिकाणी विषमता नसते. ऊस लावणारा आणि ऊस पिळणारा या दोघांनाही ऊस मधुर रस देतो. शत्रू व मित्र यांच्या बाबतीत जो सारखेपणा ठेवतो. सहा ऋतूंमध्ये आकाश सारखे असते. मेरू पर्वत दक्षिणेकडील व उत्तरेकडील वाऱ्याला सारखे लेखतो. चांदणे ज्याप्रमाणे गरीब आणि श्रीमंतांना सारखाच आनंद देते, पाणी सर्वांची तहान भागविते, त्याचप्रमाणे खरा भक्त दुष्ट किंवा सज्जनाशी सारखाच वागतो. असे विविध दृष्टान्त देऊन भगवंताच्या भक्तीत लीन झालेला बेदभावाने वागत नाही. ज्ञानी भक्त हा अंतर्बाह्य तृप्त असतो. कोणत्याही बाह्य उपचारांशिवाय समाधानाने भरलेला असतो.

**सरावासाठी पुढील प्रश्नांची उत्तरे लिहावीत**

**पाठ क्र. १**

i) ब्राह्मणाने सत्पुरुषाचा पाहुणचार कसा केला?

ii) ब्राह्मण शेतावर गेल्यावर त्याला कोणता अनुभव आला?

iii) महात्म्याने ब्राह्मण कुटुंबाचे दारिद्र्य कसे नष्ट केले?

**पाठ क्र. २**

i) राजनीतीचे कर्ते श्री शिवराय यांचे स्वभावविशेष लिहा.

ii) 'मराठियाची तो इज्जत वाचणार नाहा' असे श्री छत्रपती का म्हणतात?

iii) श्री छत्रपती शिवाजी महाराज स्थानिक प्रजेचा सांभाळ कसा करतात?

**पाठ क्र. ३**

i) शेतकऱ्यांची विदारक परिस्थिती तुमच्या शब्दांत लिहा.

ii) शेतकरी आणि सरकारी कामगार यांच्या परिस्थितीची तुलना करा.

iii) एकोणिसाव्या शतकातील 'द्रष्टे समाजसुधारक' या नात्याने महात्मा फुले यांच्या विषयीची कृतज्ञता योग्य शब्दांत व्यक्त करा.

**पाठ क्र. ४**

i) ज्ञानी भक्ताची लक्षणे कोणती?

ii) ज्ञानी भक्ताचा आपपरभाव, लोप पावलेला आहे. हे स्पष्ट करणारे कोणतेही दोन दृष्टान्त स्पष्ट करा.

**सोमवारचा विषय : विज्ञान II**

लोकसत्ता यशस्वी भव! दहावी अभ्यास मालिका

**संपर्क :** yashasvibhava2008@gmail.com




यंदाच्या पावसाळ्यात तुमच्या मुलाला
**असुरक्षित** ठेवू नका.

पावसाळ्यामध्ये पाण्यावाटे फैलावणाऱ्या आजारांची जोखीम खूपच वाढते.
ॲक्वागार्ड टोटल द्वारा तुमच्या कुटुंबीयांना जॉंडिस, टायफॉइड
आणि डायरिया सारख्या आजारांपासून संपूर्ण सुरक्षा
मिळत असल्याची खात्री करून घ्या. म्हणूनच 40 लाख माता
केवळ ॲक्वागार्ड टोटल वॉटर प्युरीफीकेशन वर विश्वास ठेवतात.

फ्री होम डेमोसाठी 56006 ला "AG" SMS* करा किंवा फोन: 098210 48777, 3988 3333



Aquaguard Total™
Total Health. Total Water Purification.
*स्पेशल SMS रेट्स लागू